बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये राहिली. त्यातून डॉक्टरांना देव मानणाऱ्या ते चुकीचे ठरू नये.



यशवंत विद्यालयात 'फ्लाइंग यंगस्टर' हा गट स्थापन करण्यात आला.

# 'फ्लाइंग यंगस्टर्स' गटाची स्थापना

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

क्विक हिल फाउंडेशन आणि पंख संस्था यांच्यातर्फे सुरू असलेल्या शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या यशवंत विद्यालयात फ्लाइंग यंगस्टर हा गट स्थापन करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांतील नेतृत्वगुण, संघटन कौशल्य, आव्हान स्वीकारणे अशा विविध गुणांचा शोध घेऊन त्यांचा गट बनविण्यात आला आहे. या गटाला 'फ्लाइंग यंगस्टर' असे नाव देण्यात आले. या विद्यार्थ्यांना ऊर्जेचा योग्य ठिकाणी वापर करून त्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. कार्यक्रमाला क्विक हिल कंपनीचे कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी विभागाचे प्रमुख अजय शिर्के, पंख संस्था प्रमुख स्मिता आपटे; तसेच इतर पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शाळांगण समुपदेशक श्वेता सूर्यवंशी, सचिन भापकर व मृणाल मापुस्कर यांनी केले.

## ८० विद्यार्थिनींना